दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ५९ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.२१ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मैदानावरील कबड्डीचा सूर प्रत्यक्ष जीवनातही लागू द्या-पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार

## स्व.डॉ.सच्चिदानंदजी मुनगंटीवार जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय कबड्डी सामने

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मैदानावर कबड्डी खेळताना प्रत्येक संघ एक सूर, एक लक्ष आणि एक विचार घेऊन खेळतो. हाच विचार प्रत्यक्ष जीवनातही आचरणात आणावा, असे आवाहन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी कबड्डीपटूंना केले. त्याचवेळी रात्री उशिरापर्यंत प्रेक्षकांमध्ये ऊर्जा कायम ठेवणाऱ्या सर्व कबड्डीपटूंना ना. मुनगंटीवार यांनी शुभेच्छाही दिल्या.स्व. डॉ. सच्चिदानंदजी मुनगंटीवार यांच्या जयंतीनिमित्त भव्य जिल्हास्तरीय कबड्डी सामने आयोजित करण्यात आले आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. यावेळी नालंदा क्रीडा मंडळाचे अध्यक्ष समीर केने, नालंदा क्रीडा मंडळाचे महामंत्री मनीष पांडे, सुधीरभाऊ फॅन्स क्लबचे अध्यक्ष श्रीकांत आंबेकर, भाजपचे जिल्हा महासचिव निलेश खरबडे, गोगी दारीजी, मुन्ना ठाकूरजी, घनश्याम बुरडकर, राजू अनचुरी यांची प्रमुख उपस्थिती होती.भाषण सुरू करण्यापूर्वी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी भारत माता की जय, वंदे मातरम्, छत्रपती शिवाजी महाराज की जय,





छत्रपती संभाजी महाराज की जय असा जयघोष केला. मैदानावर उपस्थित सर्व कबड्डीपटूंनी देखील त्यांच्यासोबत जयघोष केला. यावेळी खेळाडूंना शुभेच्छा देतानाच ना. मुनगंटीवार यांनी डिसेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेची माहिती दिली. 'बल्लारपुर क्रीडा संकुल येथे २७ ते ३१ डिसेंबर २०२३ राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन आपण केले आहे. या स्पर्धेत कन्याकुमारी ते काश्मीर आणि कामरूख ते कच्छ अशा संपूर्ण भारतातील ३००० विद्यार्थी सहभागी होतील. खेळाडूंचा हा महामेळा केवळ चंद्रपूरसाठी नव्हे तर देशासाठी आकर्षणाचा विषय ठरणार आहे,' असे ना. मुनगंटीवार म्हणाले.स्पर्धेचे आयोजन करणारे सुधीरभाऊ फॅन्स क्लबचे अध्यक्ष श्रीकांत आंबेकर व त्यांच्या टीमचेही ना. मुनगंटीवार यांनी कौतुक केले. ते म्हणाले, 'श्रीकांत आंबेकर व त्यांच्या टीमने एका चांगल्या स्पर्धेचे आयोजन व उत्तम नियोजन केले, त्याबद्दल त्यांचे व त्यांच्या टीमचे अभिनंदन करतो. श्रीकांत आंबेकर यांनी माझ्या नावाने बल्लारपूर येथे फॅन क्लब तयार केला व त्या माध्यमाने अनेक सामजिक उपक्रम ते राबवीत आहेत. स्वतःच्या प्रेरणेतून आपल्या मित्रांसोबत त्यांनी हा फॅन क्लब तयार केला. असे प्रेम करणारे कार्यकर्तेच माझा उत्साह वाढवत असतात. मी अश्या कार्यकर्त्यांच्या सदैव पाठिशी उभा असेन.'

# केंद्र शासनाच्या प्रमुख फ्लॅगशिप योजनांवर भर द्या : सम्राट राही



**वर्धा । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या वतीने सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहे. या योजनांच्या पात्र परंतू अद्याप लाभ न मिळालेल्या लाभार्थ्यांपर्यत योजना पोहोचविणे व योजनांच्या जनजागृतीसाठी विकसित भारत संकल्प यात्रा मोहिम देशभर राबविण्यात येत आहे.यासाठी संबंधित विभागांनी पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी जनजागृती करावी, अशा सूचना केंद्र शासनाचे जिल्हा प्रभारी सम्राट राही यांनी दिल्या. केंद्र शासनाच्या फ्लॅगशीप योजनांचा लाभ लक्ष्यित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १५ नोव्हेंबर ते २६ जानेवारी दरम्यान विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेच्या नियोजनाचा आढावा केंद्र शासनाच्या वतीने नियुक्त करण्यात आलेले श्यामाप्रसाद पोर्ट कोलकाताचे उपाध्यक्ष तथा वर्धा जिल्हा प्रभारी सम्राट राही (भामसे) यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत केल्या.बैठकीला प्रभारी अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा सोनाले, समुद्रपूरचे उपविभागीय अधिकारी विरेंद्र जाधव, तहसिलदार किशोर बागडे, नगर पालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त गायकवाड, अपूर्व फिरके, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी दिपक हेडाऊ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, सुनील मेसरे, मुख्याधिकारी राजेश भगत, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक चेतन शिरभाते, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक सुशांत पाटील, आरोग्य विभाग, कृषि विभाग, गट विकास अधिकारी आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.आयुष्यमान भारत, जनधन योजना, पीएम किसान कार्ड, उज्वला योजना, प्रधानमंत्री आवास योजना आदी प्रमुख योजनांवर भर देण्यात यावा, असे पुढे तज म्हणाले. आयुष्मान भारत योजनेतील लक्षांकाच्या तुलनेत कार्ड काढणा-या लाभार्थ्यांची संख्या कमी असून ही संख्या वाढविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, खेळाडू, सेलीब्रेटी व मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करुन लाभार्थ्यांना आयुष्यमान भारत कार्ड काढण्याबाबत प्रोत्साहित करावे. पीएम किसान कार्ड, जनधन योजना, अटल पेंशन योजना, जीवन सुरक्षा विमा योजना, पीएम विश्वकर्मा योजना आदी योजनांची जनजागृती करावी, अशा सूचना सम्राट राही यांनी केल्या.ज्या योजनांचा ९५ टक्के लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. अशा योजनेतील लाभार्थ्यांच्या यशकथा तयार करुन प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्द करण्यासोबत केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर योजनांच्या लाभार्थ्यांची यादी संबंधित विभागांनी अपलोड करावी. अशा सूचना राही यांनी बैठकीत दिल्या. यावेळी अपूर्व फिरके यांनी जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासनाच्या योजनांची व विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त गावपातळीवर चित्ररथासोबत योजनांच्या जनजागृती व लाभार्थ्यांना योजनांचा लाभ देण्यासाठी आयोजित शिबिराची माहिती दिली. बैठकीला सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

# क्रीडा क्षेत्रात गुणवत्ता सिद्ध करून आपली प्रगती करा-राजे अम्ब्रिशराव आत्राम



**मूलचेरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील लगाम येथे 'जय सेवा ७५० क्रिकेट क्लब लगाम' यांच्या सौजन्याने बाजारवाडी पटांगणात भव्य टेनिस बॉल (३० सर्कल) रात्री कालीन क्रिकेट सामन्याच उद्घाटन माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या हस्ते करण्यात आले.त्यावेळी स्पर्धकांना संबोधित करतांना राजे आत्राम म्हणाले आपल्या अहेरी विधानसभा क्षेत्रातील युवक क्रिकेट, फूटबॉल, कब्बडी, व्हॉलीबॉल, असे अनेक खेळ मोठ्या उत्साहात खेळतात.आपल्या क्षेत्रातील युवकांमध्ये क्रीडा क्षेत्राच्या बाबतीत भरपूर गुणवत्ता आहे,त्यामुळे युवकांनी क्रीडा क्षेत्रात आपली गुणवत्ता सिद्ध करत,आपली प्रगती क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून करावी आणि आपल्या क्षेत्राचं नावलौकिक करावे असे मत राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी व्यक्त केलं. भव्य टेनिस बॉल (३० सर्कल) रात्रकालीन क्रिकेट सामन्याचा प्रथम पारितोषिक २० हजार १ रुपये माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या कडून तर द्वितीय पारितोषिक १५ हजार १ रुपये माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रशांत कुत्तरमारे यांच्या कडून देण्यात आले.मोठ्या संख्येने यावेळी क्रिकेट संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रशांत कुत्तरमारे,तर प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते अवधेशरावबाबा आत्राम,सामाजिक कार्यकर्ते संतोष उरेते,पोलिस पाटील गिरमाजी मडावी,अमित गोविंदवार,प्रमोद चांदावार,राजू सोनटक्के,संतोष मोहूर्ले,महादेव सिडाम तसेच युवा वर्ग, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री

# छत्तीसगड सीमेवर २४ तासात पोलिस स्टेशनची उभारणी

## जिल्ह्यात घुसखोरी करणाऱ्या नक्षलवाद्यांवर लागणार अंकुश








**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली पोलिसांनी नक्षलवाद्यांचा बीमोड करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकत छत्तीसगड सीमेवरील एटापल्ली तालुक्यातील अतिदुर्गम वांगेतुरी एक हजार पोलीस जवानांच्या मदतीने एका दिवसात पोलीस स्टेशन उभे केले.पोलीस स्टेशनच्या माध्यमातून छत्तीसगड सीमेवरून जिल्ह्यात घुसखोरी करणाऱ्या नक्षलवाद्यांवर अंकुश ठेवण्यास व अबुजमाड मधील माओवाद्यांचा दहशत मोडून काढण्यासाठी मदत होणार आहे.

दक्षिण गडचिरोली परिसर नक्षल कारवायांच्या दृष्टीने अतिसंवेदनशील समजला जातो. त्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात पोलीस मदत केंद्रांची गरज आहे. त्यादृष्टीने गडचिरोली पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने वांगेतुरी येथे एका दिवसात पोलीस मदत केंद्राची स्थापना केली. सोमवारी हजारो पोलीस जवानांच्या मदतीने एका दिवसात हे पोलीस स्टेशन उभे केले. या परिसरात मोठ्या प्रमाणात नक्षल्यांची हालचाल असते. या पोलीस मदत केंद्रामुळे नक्षली कारवायांवर अंकुश ठेवण्यास मोठी मदत होणार असल्याचे पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.हा परिसर अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भाग असल्याने पोलिस स्टेशन उभारणी साठी मोठ्या प्रमाणात पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.पोलिस उप महानिरीक्षक (गडचिरोली परिक्षेत्र) संदीप पाटील यांच्याहस्ते पोलिस स्टेशनचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी गावातील नागरिकांना त्यांच्या हस्ते विविध साहित्यांचे वाटप देखील करण्यात आले.यावेळी गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक संदीप पाटील सह पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) अनुज तारे,अपर पोलीस अधीक्षक कुमार चिंता, आदी अधिकारी उपस्थित होते.

एक हजार पोलीस जवानांच्या मदतीने छत्तीसगड सीमेवर एकाच दिवशी पोलीस स्टेशन उभं करण्यात आला आहे.हा परिसर म्हणजे नक्षल्यांचा गड आहे.लगतंच अबुजमाड परिसर लागून आहे त्या ठिकाणी माओवाद्यांची दहशत आहे.ती दहशत मोडून काढण्यासाठी या पोलीस स्टेशनची मदत होणार आहे.तसेच या परिसरात विकासात्मक काम करून येथील आदिवासी बांधवांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणल्याशिवाय या भागातील नागरिक शासनावर आणि लोकशाहीवर विश्वास ठेवणार नाही.
–संदीप पाटील,पोलीस उपमहानिरीक्षक,

## संपादकीय

# निसर्ग, माणुसकीसाठी...

आजमितीला अवघे जग, मानवजात भयावह संकटाचा मुकाबला करत आहे. दररोज नवनव्या आपत्तीचा मारा झेलत आहे. वंश-वर्ण-जात-धर्म-लिंग-सांप्रदायकवादादी पिढ्यान्पिढ्या चाललेल्या भेदाभेदाबरोबरच संपत्ती-उत्पन्नाची विषमता, सत्ताकेंद्रीकरण, परिस्थितिकी विध्वंस आणि पर्यावरणीय आघात यामुळे बहुसंख्य लोक अस्वस्थ, आजारी, आगतिक आहेत. भूस्खलन, चक्रीवादळे, ढगफुटी, महापूर, वणवे, हिमनद्या वितळणे, समुद्र जलपातळीवाढ, साथ या सारख्या घटनांची वारंवारिता, उग्रता व व्यापकता विलक्षण वेगाने वाढत आहे. जगभरचे वैज्ञानिक, समाजधुरीण गेली काही दशके याकडे सत्ताधीशांचे व समाजाचे लक्ष वेधत आहे.हवामान बदलाचे संकट अधिकाधिक भीषण स्वरूपात अवकाळी, प्रलयकारी घटनांद्वारे प्रगट होत आहे. मागील दोन-अडीच दशकांत जगातील सर्व खंड बहुसंख्य देश व लोक हे भयंकर उद्धस्तीकरण, विनाशतांडव अनुभवत आहे. येणारा प्रत्येक ऋतू व महिना उष्णता, प्रपात, महापूर, वणवे, इत्यादीचे विक्रम पार करत आहेत. संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस निर्वाणीचा इशारा देत आहे की, पृथ्वी आता तापतच नाही तर होरपळत आहे. याचे मूळ व मुख्य कारण जीवाश्म इंधन (पेट्रोलियम पदार्थ, कोळसा, वायू) हे असून त्यास सत्त्वर आवर न घातल्यास पर्यावरण रक्षणाच्या सर्व बड्या बाता, परिषदा, संधी, करार व्यर्थ आहेत! आवर्जून लक्षात घेण्याची बाब म्हणजे आता १.५ अंश सेल्सियसवर तापमानवाढ रोखण्याचे इरादे व्यर्थ जाणवतात! किमान दोन अंशांवर ते रोखण्यासाठीदेखील आत्ता आणि येथे ठोस कृती करावी लागेल.होय पर्याय आहेत. तापमानवाढीस कारणीभूत असलेले कार्बन व इतर विषारी वायूंचे उत्सर्जन रोखण्यासाठी पर्यायी ऊर्जा व वाहतूक पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. त्यासाठी आवश्यक विज्ञान-तंत्रज्ञान हमखास उपलब्ध आहे. मुख्य प्रश्न आहे तो ते पर्याय तातडीने अवलंब करण्यासाठी लागणाऱ्या राजकीय दृढ संकल्पाचा. निर्धाराने विकासप्रणाली व जीवनशैली बदलण्याचा. याबाबत ऐतिहासिक उत्सर्जनास जबाबदार असलेल्या देशाची जबाबदारी आहे. आजघडीला चीन, अमेरिका व भारत हे अनुक्रमे पहिले, दुसरे व तिसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक उत्सर्जन करणारे देश आहेत.भारताने मानवतेच्या व वसुंधरेच्या रक्षणार्थ काय करावे, काय करणे शक्य आहे याचा विचार करणे सयुक्तिक होईल. खरेतर आपल्या देशाच्या व जनततेच्या स्वहितार्थ, व्यापक लोककल्याणार्थदेखील हे करणे आवश्यक आहेच. भारताचे भौगोलिक क्षेत्र जगाच्या २.४ टक्के असून लोकसंख्या १७ टक्के आहे. आमची कृषी हवामानाची रचना, जैवविविधा व पर्जन्यमान सर्व जनतेच्या भरणपोषणाच्या गरजा भागविण्यास अनुकूल आहे. आपली जलसाधने (पर्जन्य व हिमवृष्टी) जगाच्या तुलनेत चार टक्के; म्हणजे जमिनीच्या प्रत्येक घटकामागे दुप्पट आहेत. खचितच ही एक मोठी संसाधन अनुकूलता असून आपली जमीन-पाणी, वने-कुरणे, पशू-पक्षी, जीवजंतू, मुबलक सूर्यप्रकाश व मनुष्यबळ याचा वापर करून आपण प्रत्येक भारतीयास चांगल्या गुणवत्तेचे जीवनमान सहज देऊ शकतो.पण, आज देशात दारिद्र्य, कुपोषण, अभावग्रस्तता याचे प्रमाण मोठे आहे. १४३ कोटी भारतीयांपैकी तब्बल शंभर कोटी भारतीय वंचित जीवन जगण्यास मजबूर आहेत. कारण की संसाधनांची विषम मालकी, चरितार्थ साधनांची उपलब्धता, बेरोजगारी, महागाई, बकालपणा, प्रदूषण आणि सामाजिक-आर्थिक सुरक्षेचा अपुरेपणा. यांमुळे ते कमालीच्या हालअपेष्टेत आहे. हे सर्व अलगपणे घडत नसून यास आपली आजवरची धोरणे, कायदेकानून जबाबदार आहेत, हे नाकारण्यात काय हशिल?मूठभरांची चैनचंगळ, ऐषआराम व नफेखोरीसाठी जे उत्पादन तंत्र वापरले जाते, ते निसर्गाचे अनाठायी, अतिरेकी दोहन व श्रमाचे शोषण करणारे आहे. परिणामी, प्रचंड सामाजिक-आर्थिक विषमता निर्माण केली गेली आहे. त्याविरुद्ध श्रमजीवी लोकांनी एकजूट करून नये म्हणून जातीय व धार्मिक धुव्रीकरणाचे तंत्र वावरले जाते. विषमता किती वेगाने वाढली याचे एकच उदाहरण व आकडेवारी यावर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहे. देशातील वरच्या जेमतेम एक टक्क्यांकडे ४० टक्के तर दहा टक्के लोकांकडे ७० टक्के संपत्ती व ५४ टक्के उत्पन्न आहे. याउलट तळाच्या ५० टक्क्यांकडे (श्रमजीवी) केवळ तीन टक्के संपत्ती असून त्यांना फक्त १३ टक्के उत्पन्न मिळते. राज्यघटनेने सर्वांना संधीची समानता घोषित केली असली तरी मुळात संपत्तीचे मालकी विषम असल्यामुळे धनदांडगेच ती अधिकाधिक बळकावतात. सवलती लाटतात. सत्तास्थाने काबीज करतात.विकासाचे जे निरर्थक वाढवृद्धीप्रवण प्रारूप, जग व भारतात रुढ आहे ते सरळसरळ निसर्ग व श्रमजनविरोधी आहे. ते अजिबात समतामूलक व शाश्वत नाही. विषमता व विध्वंस त्यात अध्याहत आहे, हे नि:संदिग्धपणे अधोरेखित केले पाहिजे. प्रारंभी नमूद केल्यानुसार, हवामान अरिष्टाच्या सद्य:स्थितीत हे वाढवृद्धीप्रवण विकास प्रारूप क्षणभरही चालू ठेवणे चक्क वेडेपणा आहे. उत्पादन व उपभोग पद्धतीमुळे आज कार्बन उत्सर्जन व तापमान वाढीचे महासंकट आ वासून आहे. त्यास सोडचिठ्ठी दिल्याखेरीज प्रचलित सापळ्यातून बाहेर पडणे सुतराम शक्य नाही. यासाठी नव्या कृषिक्रांतीची व समाजक्रांतीची नितांत गरज आहे.उपरिनिर्दिष्ट पार्श्वभूमी व परिप्रेक्ष्य समोर ठेवून व्यापक विचार व कृतीसाठी काही उपाययोजना गरजेच्या आहेत. जसे की, राज्यघटनेची 'मूलभूत रचना' नेमकी काय यावर राष्ट्रीय चर्चा अत्यावश्यक आहे. 'प्रत्यक्ष कसेल त्यालाच जमीन हक्क' ही स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख मागणी सत्त्वर अमलात आणणे गरजेचे आहे. संपत्ती व उत्पन्नाच्या कमालधारणेवर मर्यादा; अविभाजनीय संपत्तीवर महत्तम कर हवा. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३० टक्के कर महसूल गोळा केला जावा आणि त्याचा विनियोग कष्टकरी व सामान्य जनतेच्या गरजापूर्तीसाठी अग्रक्रमाणे व्हावा. प्रत्येक व्यक्तीस शुद्ध हवापाणी, विषमुक्त खाद्यान्न, पुरेसे, कापड, मानवीय निवारा, दर्जेदार आरोग्यसेवा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, किमान ऊर्जा, सार्वजनिक वाहतूक सोयी, डिजिटल जोडणी, सांस्कृतिक सुविधा व सामाजिक सुरक्षा हमी, हा मूलभूत हक्क मानून त्याची पूर्ती केली जावी. कोळसा, डिझेल-पेट्रोल, वायू आदि जीवाश्मइंधन वापरावर मर्यादा व बंदीची कठोर उपाययोजना करण्यात यावी. औद्योगिक व रासायनिक शेतीवरची तमाम अनुदाने (रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके, यंत्रे) बंद करून सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन द्यावे. बायोगॅस, गांडुळे, जैवविविधता संवर्धनावर भर द्यावा. रेल्वे व जलवाहतुकीला प्रोत्साहन द्यावे. महामार्गाऐवजी रेल्वेविस्तार व्हावा. महात्मा गांधी यांचा शाब्दिक गुणगौरव करण्याऐवजी यांच्या जीवनशैली व निसर्गस्नेही विकासप्रणालीचे सर्वत्र अनुकरण व्हावे. दारू, तंबाखू व अन्य अमली पदार्थांचे उत्पादन व सेवनावर संपूर्ण बंदी हवी. हवामान आणीबाणीचे भान राखून निसर्गविषयी पूज्यभाव, सर्व प्राणिमात्राविषयी आदर, सूक्ष्म जीवजंतूंचे रक्षण-संवर्धन हाच खरा राष्ट्रधर्म, युगधर्म मानावा.

# तन्हा तन्हा लौटा हूं, भरी महफिलसे!



कळविण्यास अत्यंत दु:ख होत आहे की तिसऱ्यांदा आयसीसी विश्वचषक जिंकण्याचे आपले स्वप्न भंगले असून ऑस्ट्रेलिया ने सहाव्यांदा हा चषक पटकावला आहे. अत्यंत उत्कंठा लागलेल्या या लढतीत भरवश्याच्या म्हशीला टोणगा झाला आहे. अंतिम फेरीपर्यंत स्वप्नवत कामगिरी करणारा आपला संघ कांगारूंचा चक्रव्यूह भेदू शकला नाही आणि लाखो करोडो देशवासियांना दु:खाचा आवंढा गिळावा लागला आहे. १९८७ पासून क्रिकेट जगतावर दादागिरी दाखवणाऱ्या कांगारूंनी आपल्या लौकिकाला जागत गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातही दर्जेदार कामगिरी करत दोन्ही संघांतील फरक दाखवून दिला आहे.झाले काय तर अंतिम सामना कसा खेळायचा असतो, कसा गृहपाठ करायचा असतो, घेतलेल्या निर्णयाला प्रत्यक्षात कसे उतरवायचे असते याचा संपूर्ण सातबारा काल कांगारूंनी क्रिकेट जगताला दाखवला आहे. अगदी नाणेफेक जिंकून ज्या स्मितहास्याने कमीन्सने क्षेत्ररक्षण पत्करले ते पाहता कांगारूंच्या दृढनिश्चयाची कल्पना येते. काळीसावळी खेळपट्टी आणि दवबिंदू ची शक्यता लक्षात घेत कमीन्सने रोहीत ॲंड कंपनीला फलंदाजीला उतरवले आणि त्यांचा अभ्यास किती पक्का आहे याची जाणीव झाली. अनुभवी मिचेल स्टार्कला फारसे स्वींग, सीम न दिसल्याने कमीन्सने कडेकोट क्षेत्ररक्षणाची तटबंदी उभारली.फलंदाजांसाठी ऑन,लेग ला सगळा फौजफाटा उभारून आपल्या फलंदाजांची कोंडी केली गेली. नेहमीप्रमानेच रोहीतने हल्ले करत डावाला सुरुवात केली परंतु यावेळी शुभमनने त्याला फारशी साथ दिली नाही. तरीपण रोहीतचे विराटच्या साथीने दे दणादण सुरू होते. इथेच कमीन्सने कल्पकता दाखवत चक्क रोहीतची विकेट विकत घेतली. पार्ट टाइम फसव्या ग्लेन मॅक्सवेलला पाहून रोहीतच्या तोंडाला पाणी सुटले. मात्र मॅक्सवेल नावाची शेळी त्याच्या शिकारीसाठी आणली गेली आहे याचा त्याला विसर पडला. इतर सामन्यात रोहीतने मानवी बॉम्ब होऊन प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर तुटून पडणे पचले होते. मात्र अंतिम सामन्यात कुठेतरी यावर नियंत्रण ठेवणे किंवा आवर घालणं गरजेचे होते. इथेच रोहीतची गफलत झाली.मॅक्सवेलच्या षटकांत चौकार षटकार सहीत दहा धावा झाल्या असतांनाही रोहीत पुढे सरसावला आणि संघाला बॅकफूटवर ढकलून गेला. खरेतर कांगारूंना सामन्यात वर्चस्व गाजवण्यास हा क्षण पुरेसा ठरला. कारण यानंतर श्रेयस कधी आला कधी गेला कळलेच नाही.

डॉ.अनिल पावशेकर
sahyandrinews@gmail.com

त्यातही केवळ सहा फलंदाज आणि एकमेव अष्टपैलू म्हणून जडेजा असल्याने विराट, राहुलवर दबाव स्पष्ट दिसत होता. या दोघांनीही फलंदाजीत अहिंसा परमो धर्मचा वसा घेतल्याने संघ चिखलात फसला तो त्यातून शेवटपर्यंत बाहेर पडू शकला नाही.

एकवेळ बेडकाची शितनिद्रा (हायबरनेशन) लवकर संपली असती परंतु विराट, राहुलची शांत,संयमी, प्युअर व्हेज फलंदाजी काही केल्या टॉप गिअर टाकत नव्हती.भरीस भर म्हणून कांगारू क्षेत्ररक्षक जणुकाही शिलाजीत खाल्यासारखे मैदानात दम दाखवत होते. तिशीचे लाबुशेन, ट्रॅव्हिस हेड आणि छत्तीसचा वॉर्नर जिंकू किंवा मरू वृत्तीने प्रत्येक चेंडूवर झेपावत होते. हेड ने रोहीतचा जो झेल पकडला तो केवळ आणि केवळ हेडच पकडू शकतो इतका तो कठीण होता, त्यात त्याचे जबरदस्त कमिटमेंट होते. इकडे हेडने रोहीतचा झेल पकडला आणि भारतभर सागरा प्राण तळमळला झाले. भलेही आपले टॉप ऑर्डरचे तीन फलंदाज बाद झाले होते परंतु विराट, राहुलच खेळपट्टीवर पंगत मारून बसणं टीम इंडियाच्या अंगलट आलं. या दोघांनीही जवळपास पंधरा षटके ना चौकार हाणला ना षटकार. कांगारूंचा दबाव झुगारून टाकण्यात हे दोघेही अपयशी ठरले. या दोघांनीही अर्धशतकी खेळी केली परंतु ती वांझोटी ठरली.दोघांच्याही दिनमे चले ढाई कोस खेळीने ना संघाचा टेम्पो वाढला, ना येणाऱ्या फलंदाजांना आत्मविश्वास राहीला, ना या दोघांना. याच दबावात विराट आपली विकेट गमावून बसला. पॅट कमीन्सने या संपूर्ण स्पर्धेत स्लो बाऊंसर, स्लोअरवन वर बळींची माया जमवली. आपले संघ व्यवस्थापन यावर तोडगा का काढू शकले नाही ते कळायला मार्ग नाही. त्याचीच री जोश हेझलवूडने ओढली. जडेजा काय नी सूर्या काय ,, दोघांनाही कांगारूं गोलंदाज कुक्कल बाळ समजून खेळवत होते. सूर्यासाठी लेगला तटबंदी उभारली आणि चेंडूची गती कमी केली की तो लवकरच मावळतो हे प्रतिस्पर्धी गोलंदाजांच्या चांगले लक्षात आले आहे. रोहीत सोडला तर पांव भारी होना म्हणजे काय असते हे आपल्या फलंदाजांचे फुटवर्क पाहून समजत होते. कांगारूंच्या दडपणाखाली आपले खेळाडू फुटवर्क विसरून गेले होते. पुढे जातो तर बाऊंसर, मागे जातो तर इनर सर्कलचे क्षेत्ररक्षक खाऊ की गिळू करत सिंगल देत नव्हते.संपूर्ण स्पर्धेत आपली फलंदाजी इतकी हतबल आणि फॅमिली प्लॅनिंग चे ऑपरेशन झाल्यासारखी पाहण्यात आली नव्हती, निव्वळ खेळत होते पण धावा होत नव्हत्या. जणुकाही भारताचा दुय्यम संघ फलंदाजीला उतरला आहे असे वाटत होते. अखेर व्हायचे तेच झाले. अडीचशेच्या आत आपला गाशा गुंडाळला गेला. वास्तविकत: इतकी धावसंख्या कांगारूंना दमवायला पुरेशी नसली तरी टक्कर देण्याइतपत नक्कीच होती. त्यातही शमी बुमराहने सनसनाटी सुरूवात करून दिली होती. मुख्य म्हणजे स्टीव्ह स्मिथने रिव्ह्यू न घेता एक विकेटची गिफ्ट पण दिली होती.शमी, बुमराहने जी अप्रतिम सुरूवात करून दिली, ती लय ना फिरकीपटुंनी राखली, ना सिराज ने. पहिला पॉवर प्ले संपताच हेड ने आपले असली रूप दाखवले. खरेतर काहीही झाले तरी आक्रमण हाच बचावाचा उत्तम मार्ग आहे हे हेडने जाणून दणक्यात फलंदाजी केली. बरेचदा स्टंप उघडे सोडून तो फटकेबाजी करत होता. नंगे से खुदा डरे म्हणतात ते याचसाठी! कित्येकदा तो बिट झाला, बाद होता होता वाचला. पण बचेंगे तो और लढेंगे करत त्याने वायग्रा फलंदाजी केली. बचानेवालेसे मारनेवाला बडा होता है, हे त्याने दणकेबाज फलंदाजी करत दाखवून दिले. तसेही ऑसी म्हटले की त्यांच्या रक्तात आरबीसी, डब्ल्यूबीसी, प्लेटलेट्स असो वा नसो, आक्रमक पेशी प्रचुर मात्रेत असतात. कांगारूंच्या आक्रमक प्रोच पुढे रोहीतचा संघ गरीब गाय वाटत होता.खेळात हारजीत तर होणारच. मात्र अंतिम सामन्यात, मोठ्या स्टेजला प्लॅनिंग, होमवर्क किती करता यावर सगळं अवलंबून असते. एकदिवसीय सामना म्हटला की धावगतीची काळजी घेतलीच पाहिजे. कामचलाऊ हेड आणि मिचेल मार्शच्या दोन दोन षटकांत केवळ चार पाच धावा निघत असेल तर प्रमुख गोलंदाजांच्या षटकांबाबत न बोललेले बरे! विराट, राहुलने इतके कोषात जाऊन खेळणे संघाला भारी पडले. कांगारूंनी टीम इंडियाची शिकार करताना तब्बल सात गोलंदाज वापरले तर आपल्याकडे फक्त पाचच पर्याय होते. कांगारूंनी एकंदरीत बावीस चौकार आणि पाच षटकार ठोकले तर आपण फक्त बारा चौकार आणि तीन षटकार. म्हणजेच कांगारूंनी बाऊंड्रीने ११८ धावा, तर आपण केवळ ६६ धावा गोळा केल्या.थोडक्यात काय तर मेहनती, अभ्यासू, ध्येयवेड्या आणि प्रचंड चिकाटीच्या विद्यार्थ्यांने मेरीटच्या विद्यार्थ्यांला मात दिली. अंतिम फेरीपर्यंत दमदार कामगिरी करणाऱ्या टीम इंडियाचे श्रेय कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. तरीपण क्रिकेट जगतात एका बाजूला ऑस्ट्रेलियन संघ आणि दुसऱ्या बाजूला इतर सर्व संघ अशी दरी पहायला मिळते. इतर संघ विजयी जरूर होऊ शकतात, होतात. पण चॅम्पियन म्हणून बिरूदावली एकच संघ मिरवू शकतो आणि तो म्हणजे ऑस्ट्रेलियन संघ. प्रत्येक सामना अंतिम सामना म्हणून खेळण्याची वृत्ती त्यांना चॅम्पियन बनवून जाते. राहिली बाब टीम इंडियाची तर, या सामन्यात कांगारूंची कामगिरी त्यांच्या पेक्षा सरस झाली. रोहीतचा उताविळपणा, विराट राहुलचा संथपणा, जडेजा सूर्याला सूर न गवसण्याने आपला संघ मोठी धावसंख्या उभारू शकला नाही. तर बुमराह,शमी वगळता इतर गोलंदाज दबाव टाकू शकले नाही. दिमतीला ढिसाळ,सुस्त क्षेत्ररक्षणाने उरलेसुरले काम पूर्ण केले. टीम इंडियाची या सामन्यात भट्टी जमलीच नाही. त्यामुळे,, तन्हा तन्हा लौटा हूं मैं तो भरी महफिलसे अशी आपल्या संघाची अवस्था झाली.

# निशासंस्कृतीचे नियमन



अर्थकारण वाढवायचे तर मुक्त निशाजीवन हवे, हे सगळ्या सत्ताधारी व धोरणकर्त्यांना पटलेच आहे. त्यातून पुढे निर्माण होणारे गुन्हेगारी, व्यसनाधीनता, विविध आजार आणि बिघडते सामाजिक समीकरण हे सारे रुळावर आणण्यासाठी मग नंतर नवनवे उपाय योजायचे. या साऱ्यांतून अर्थव्यवस्थेचा विस्तार होतोच!वेगाने विकसित होत जाणाऱ्या महानगरांसाठी 'रात्रकालीन महापौर' हवा; ही संकल्पना पहिल्यांदा नेदरलँड्समध्ये जन्माला आली. त्यानुसार, राजधानी ॲमस्टरडॅममध्ये पहिला निशा-महापौर सन २००३मध्ये कारभार हाकू लागला. त्याला यंदा दोन दशके पुरी झाली आहेत. ही संकल्पना जन्माला आल्यानंतर ती प्रामुख्याने युरोप आणि अमेरिका तसेच इतर विकसित देशांमध्ये पसरली. आज जगातील किमान पन्नास मोठ्या शहरांमध्ये हे निशा-महापौर आहेत. जगभरातील सर्वच महानगरांमध्ये फोफावत चाललेल्या निशाजीवनाचे नियमन, नियंत्रण, समन्वय आणि गरज पडेल तिथे सामोपचार या महापौरांनी करावा, अशी अपेक्षा असते. निशाचरांचा वाढता वावर व व्याप पाहता काही दिवसांनी ही संकल्पना भारतातही येईलच. भारतात दिवसाचे महापौर आणि रात्रीचे महापौर यांच्यातील अधिक शक्तिशाली कोण ठरेल, हे वेगळे सांगायला नको. युरोप आणि अमेरिकेने मात्र हे पद बरेच गंभीरपणे घेतले आहे. यामुळे, या निशा-महापौरांची कामेही वाढत चालली आहेत.जगाच्या अर्थकारणाला खंबीर टेकू देणारा घटक म्हणजे निशाजीवन. या निशाजीवनात ऊर्ध्वविश्व आणि अधोविश्व यांचा विचित्र संगम झालेला असतो. त्यांच्यात भेदाभेद करणेही अनेकदा अवघड असते. असे असले तरी, अमेरिकेसहित जगातील सर्व देशांची आर्थिक विकासाची व समृद्धीची भूक बिलकुल शमलेली नाही. जगातील एकूण निशाजीवनाचा व्याप लवकरच सातशे बिलियन डॉलरच्या घरात जाईल. या रकमेतही निशाजीवनाचे काही घटक मोजण्याचे राहिले आहेत. भारत जी पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेची स्वप्ने पाहात आहे; त्यातला सहा ते आठ टक्के वाटा हा नाईट लाईफचा असेल. यात महामुंबई-महापुण्यासहित दहा महानगरांचा सर्वाधिक सहभाग असेल. दारू, देहव्यापार, नशापान, नृत्यागारे, जुगार, उंची उपहारगृहे, मेजवान्या, अनौपचारिक आर्थिक वाटाघाटी आणि प्रत्यक्ष होणारे गुन्हे हा सगळा निशाजीवनाचा भाग असतो. यातले सगळेच वाईट असते, असे नाही. (जगात काही शहरांत २४ तास उघडी राहणारी ग्रंथालये आहेत. त्यांचाही यात समावेश करायला हरकत नाही!) मात्र, हे सगळे काहीसे निसरडे आणि कायम अनिश्चिततेची टांगती तलवार असणारे विश्व आहे. त्यामुळे, ते चालू तर राहावे पण फार घसरूही नये; यासाठी निशा-महापौर लागतात.'ऑक्सफर्ड'ने 'नाइट लाइफ अँड क्राइम' हा संशोधनप्रबंध प्रकाशित केला आहे. फिल हॅडफिल्ड यांनी संपादित केलेल्या या ग्रंथात १७ देशांचा सखोल अभ्यास मांडला आहे. पूर्वी, ऑस्ट्रेलिया आणि ब्रिटन या दोन देशांमध्ये नाइट लाइफमुळे गुन्हेगारी वाढते, असे म्हटले जाई. या अभ्यासामुळे हाँगकाँग, स्पेन किंवा कॅनडा अशा देशांमध्येही या दोन्हीत कसा थेट संबंध आहे, हे लक्षात आले. 'अल्कोहोल ॲलर्ट' या बहुराष्ट्रीय संस्थेला या अभ्यासाचा फायदा झाला आणि दारूमुळे गुन्हेगारी कशी वाढते, या युक्तिवादाला बळ आले. अशा मद्यगुन्ह्यांमुळे लंडनमधील छोटे, कुटुंबांना सामावून घेणारे २५ टक्के पब आणि उपहारगृहे बंद पडल्याची नोंद आहे.या गुंतागुंतीच्या विश्वाला थोडी शिस्त लागावी आणि हा अर्थव्यवहार मात्र कमी होऊ नये, यासाठी खंबीर प्रयत्न केल्याचे श्रेय ॲमस्टरडॅमचे तरुण निशा-महापौर मिरिक मिलान यांना दिले जाते. सन २०१२ मध्ये महापौर झाल्यानंतर त्यांनी नागरिकांना तात्काळ माहिती व मदत मिळेल, यासाठी 'रिअल टाइम ई मदत केंद्रां'चे जाळे उभे केले. १९८१ मध्ये जन्मलेले मिरिक स्वत: रस्त्यांवर उतरत आणि वातावरण हसते-खेळते राहील पण ते घसरणार नाही, याची काळजी घेत. सतराव्या शतकातील विख्यात चित्रकार रेम्ब्रा याचे घर असलेल्या विशाल चौकाकडे साऱ्या जगातील धनंतर तरुणाईचा ओघ असतो. तेथे थोड्या शिस्तीचे पण मोकळे वातावरण तयार करणे, हे आव्हान होते. ते मिरिक यांनी पेलले. जगभरात याचे कौतुक झाले. पुढे हे मॉडेल लंडनचे महापौर सादिक खान यांनी स्वीकारले. लंडनमधील निशाजीवनाला थोडी शिस्त लागली.भारतात एका बाजूला कधी कधी आत्यंतिक पूर्वगौरव आणि दुसरीकडे, तथाकथित मुक्त बाजारपेठीय अर्थशास्त्रीय मॉडेलचे स्वैर अनुकरण असे विचित्र परस्परविरोधी चित्र आज आहे. अर्थकारण वाढवायचे तर मुक्त निशाजीवन हवे, हे सगळ्या सत्ताधारी व धोरणकर्त्यांना पटलेच आहे. त्यातून पुढे निर्माण होणारे गुन्हेगारी, व्यसनाधीनता, विविध आजार आणि बिघडते सामाजिक समीकरण हे सारे रुळावर आणण्यासाठी मग नंतर नवनवे उपाय योजायचे. या साऱ्यांतून अर्थव्यवस्थेचा विस्तार होतोच! जगातील ज्या ५० महानगरांनी सध्या निशा-महापौर नेमले; त्यांचाही एक डोळा तिथल्या निशाचारातून येणाऱ्या वाढत्या उत्पन्नावर आहेच. उद्या भारतालाही त्यांचेच अंधानुकरण करण्यात फुशारकी वाटणार आहे! ...

# संशयित क्षयरुग्ण शोधून त्यांना नियमित औषधोपचार करा

# जिल्हाधिकाऱ्यांकडून जिल्हाटीबी फोरम समितीचा आढावा





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

क्षयरोग दूर करण्यासाठी समाजात असलेले क्षयरुग्ण शोधून त्यांना औषधोपचाराखाली आणणे वया रोगाचासंसर्ग कमी करणे हा राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम वराष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलनकार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. त्यानुसार आरोग्य विभागाने संशयित क्षयरुग्ण शोधून त्यांना नियमित औषधोपचाराखाली आणावे, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिल्या.जिल्हा टिबी फोरम समितीचा आढावा घेतांना ते बोलत होते. वीस कलमी सभागृहात आयोजित या बैठकीलामुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. ललितकुमार पटले, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. प्रकाश साठे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, जास्तीत जास्त संशयित क्षयरुग्णांना शोधून त्यांचे निदान करण्यासाठी तपासणी करावी व क्षयरुग्ण आढळल्यास त्याला औषधोपचाराखाली आणून बरे करावे. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम वराष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत संयुक्त कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोधमोहिम जिल्हयामध्ये२० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२३ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान ग्रामीण भागातील १०० टक्के आणि शहरी भागातील २० टक्के लोकसंख्येची तपासणी घरोघरी जाऊन आरोग्य चमुमार्फत करण्यात येणार आहे.आरोग्य चमू घरी आल्यास नागरीकांनी कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण तपासणीसाठी सहकार्य करावे तसेच निदान करून उपचार घ्यावेत.

**संयुक्त कुष्ठरुग्ण व क्षयरुग्ण शोध मोहिमेची अंमलबजावणी:**
जिल्ह्यातील १८ लक्ष ३४ हजार २४५ लोकांची तपासणी १ हजार ५१३ चमूमार्फत २० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२३ या कालावधीत करण्यात येणार आहे.सर्व नागरिकांनी कर्मचाऱ्यांमार्फत आपल्या आरोग्याची तपासणी करून अभियानास सहकार्य करावे.लक्षणे आढळून आल्यास त्वरित जवळीलप्राथमिकआरोग्य केंद्रात तपासणी करुन घ्यावी. निदान झाल्यास क्षयरोगावर संपूर्ण औषधोपचार केल्यास रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो.

**टीबी फोरम समितीचे उद्देश:**
लोकसहभागातून व क्षयरुग्णांच्या दृष्टीकोनातून क्षयरोग प्रतिसाद मजबूत करणे, क्षयरोगाने ग्रस्त लोकांचे नेटवर्क बनवुन त्यांच्या माध्यमातून टिबी कार्यक्रमात समुदायांचा सहभाग वाढविणे, क्षयरोगाप्रती समाजामध्ये भेदभावदूर करणे व त्यांना शासकीय सोयी व सेवा उपलब्ध करून देणे तसेच समाजामधून क्षयरोगाचे दूरीकरण करून समाज क्षयमुक्त करणेहा टीबी फोरम समितीचा उद्देश आहे.

**निक्षय मित्र बनून मदत करण्याचे आवाहन:**
क्षयरुग्ण औषधोपचार घेत असतांना त्यास योग्य तो पुरक पोषण आहार मिळावा, तो क्षयमुक्त व्हावा यासाठी स्वयंसेवी संस्था अथवा दानशूर व्यक्तीने एका क्षयरुग्णास दर महिन्याला एक याप्रमाणे ६ महिन्याकरीता फुड बास्केट (न्युट्रीशन किट) देवून निक्षय मित्र बनून मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फुड बास्केटमध्येतांदूळ/गहू ३ किलो, तूरडाळ दीड किलो, शेंगदाणे १ किलो खाण्याचे तेल १ लिटर, याव्यतिरिक्त ऐच्छिकरीत्या चणाडाळ, मुगडाळ, मोट, मसूर, बरबटी, राजमा, सोयाबीन वडी, शेंगदाणा व राजगिरा चिक्की, खजूर व कणिक आदी साहित्य देऊन क्षयरुग्णास सहाय्य करू शकता.

**क्षयरोगाची लक्षणे:**
दोन आठवड्यापेक्षा जास्त खोकला व ताप, वजनामध्ये लक्षणीय घट, मानेवर गाठ, थुंकीद्वारे रक्त जाणे, सायंकाळी ताप येणे व रात्रीला हातापायाला घाम येणे ही क्षयरोगाची लक्षणे आहे. संपूर्ण औषधोपचार केल्यावरच या रोगाचा संसर्ग कमी होऊ शकतो व रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकतो.

## मंदिरात पूजा करण्या साठी गेलेल्या व्यक्तीला वाघाने केलं ठार

**चंद्रपूर–**चंद्रपूर वनपरिक्षेत्रातील दक्षिण लोहारा नियतक्षेत्रातील जंगलात शाळेच्या एका बस चालकावर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना २० नोव्हेंबर रोज , सोमवारला दुपारी उघडकीस आली.

मनोहर वाणी हे लोहारा नियतक्षेत्रातील जंगलात एका छोट्या मंदिरात सकाळी पूजा करण्यासाठी गेले होते. त्यावेळी वाघाने झडप घालून त्यांच्या नरडीचा घोट घेतला.सदर बाब दुपारी उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने दाखल झाले. मनोहर वाणी हे श्री जैन सेवा समिती संचालित विद्यानिकेतन हायस्कूल दादावाडी येथील शाळेत बस चालक म्हणून मागील १५ वर्षापासून कार्यरत होते. त्याच्या पश्चात दोन मुली व पत्नी असा परिवार आहे. या घटनेनंतर परिसरात गस्त वाढविण्यात आली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वरोरा तर्फे नामदार संजय बनसोडे यांचे जल्लोषात स्वागत



**वरोरा–**नामदार संजय बनसोडे क्रीडा, युवक कल्याण व बंदरे मंत्री जिल्ह्याच्या शासकीय दौऱ्यावर असताना नागपूर येथून चंद्रपूरला जात असताना वरोरा येथील रत्नमाला चौकात फटाक्यांच्या आतिषबाजीत नामदार संजय बनसोडे यांचे स्वागत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी वरोरा भद्रावतीचे विधानसभा अध्यक्ष विलास नेरकर यांनी शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले तसेच वरोरा तालुका क्रीडा संकुलन साठी विकास निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावे असे निवेदन देण्यात आले.

त्यावेळी तालुकाध्यक्ष रवींद्र भोयर व शहराध्यक्ष चंद्रकांत कुंभारे यांचेकडून शहर व ग्रामीण ची क्रीडा विषयीची माहिती जाणून घेतली वरोरा येथील राष्ट्रीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धा मधून निवड झालेल्या कुमारी ईश्वरी राऊत व कुमारी सृष्टी चट्टे यांचे मंत्री महोदयाने कौतुक करून सत्कार केला.यावेळी वरोरा स्पोर्ट फाउंडेशनचे अध्यक्ष गजानन जीवतोडे,किशोर पिरके, विनोद उमरे,स्फुर्ती स्पोर्टींग क्लबचे सेक्रेटरी सुनिल जवदंड,राजू दोडके यांनी ना. बनसोडे यांचे स्वागत केले.वरोरा तालुक्यातील प्रवीण सुराणा,परमानंद तिरणीक, वरोरा तालुका पत्रकार ‍िरपसहरलह३ अध्यक्ष पत्रकार प्रवीण खिरटकर,निखिल विरुटकर,फकिरचंद कोटांगले, आणि शहरातील मुलं, मुली प्रामुख्याने उपस्थित होते.राष्ट्रवादी काँग्रेसचे भद्रावती शहराध्यक्ष गितेश सातपुते,युवक अध्यक्ष दिनेश मोहरे सुधाकर उपरे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आयुध निर्माणी कर्मचारी २१ नोव्हेंबरला दिल्लीसाठी रवाना

**भद्रावती । प्रतिनिधी**

-संपूर्ण देशभरातून आयुध निर्माणीमध्ये कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी केंद्र सरकारच्या निगमीकरण व जुन्या पेंशन योजनेकरिता दिनांक २२ नोव्हेंबर २०२३ रोजी भारतीय मजदूर संघ, सरकारी कर्मचारी राष्ट्रीय परिसंघ व भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघ यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय राजधानी नवी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे मोठ्या संख्येने धरना प्रदर्शनकरिता एकत्र होत आहेत.

याकरिता भद्रावती, जिल्हा चंद्रपूर येथील आयुध निर्माणी चांदा येथील जवळपास ५०-६० कर्मचार्यांचा जत्था धरना व प्रदर्शनमध्ये सामील होण्याकरिता आज दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजी दिल्ली करिता कूच करीत आहेत. भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य सदानंद गुप्ता यांनी याबाबत माहिती देतांना सांगितले की, आयुध निर्माणी चांदा येथील भारतीय सुरक्षा कर्मचारी संघाचे अध्यक्ष अविनाश सोनटक्के, महामंत्री संजय सिंह, जितेंद्रकुमार नायक, संदीप हजारे, राजकुमार नायक, धर्मेंद्रकुमार पाल, रविकांत दसौंधी यांच्या समवेत संघठनेचे जवळपास ५०-६० सदस्य कर्मचारी दिनांक २१ नोव्हेंबरला दिल्लीसाठी कुच करतील. भारतीय मजदूर संघ व भारतीय प्रतिरक्षा मजदूर संघ नेहमीच आयुध निर्माणीच्या निगमीकरणचा विरोध करीत आलेले आहेत. या बाबतीत आपला आवाज केंद्र सरकारपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने संपूर्ण देशभरातून आयुध निर्माणी कर्मचारी नवी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे एकत्र येऊन या नीतीच्या विरोधात आपला विषय मांडतील.

## ’मविआ’ने फडणवीसांच्या योजना बंद पाडल्या–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई–**देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मी कॅबिनेटमध्ये होतो. त्यांनी अनेक योजना सुरू केल्या होत्या. मात्र मविआ सरकारने त्या योजना बंद पाडल्या, चौकश्या लावल्या अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. भंडाऱ्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, काही लोक म्हणतात सरकारकडून मोठे कार्यक्रम केले जातात सरकारची नियत खराब आहे. प्रसिद्धीसाठी सरकार या कार्यक्रमांचे आयोजन करत असते. मात्र आमची नियत खराब असती NDRF SDRF चे नियम आम्ही बाजूला केले नसते, शेतकऱ्यांना दुप्पट मदतीचा निर्णय घेतला नसता. पावसामुळे होणारे नुकसान नुकसान भरपाईमध्ये धरले नसते असेही शिंदे म्हणाले.पुढे बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा



साधत जोरदार टीका केली आहे. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलेल्यांना शासन आपल्या दारी काय दिसणार. जिल्ह्याच्या बाहेर न जाणाऱ्यांना घर आणि दार कसे दिसणार असे शिंदे म्हणाले. तसेच तुम्ही कितीही टीका करा हा मुख्यमंत्री कामातूनच उत्तर देईल असा सडेतोड इशारा देखील मुख्यमंत्री शिंदे यांनी दिला.महायुती सरकारच्या काळात योजनांचे लाभ घेणारे लोक शासन आपल्या दारीच्या माध्यमातून व्यासपीठावर येऊन लाभ घेत आहेत हे चित्र प्रथमच समोर आले. कोणाला घर, नोकरी, टँकर, शौचालयासाठी पैसे मिळाले. ज्या योजना सरकारने राभवल्या त्या एका छताखाली मिळण्यासाठी हे आपल्या मनातले सरकार आम्ही स्थापन केले. छातीठोकून सांगतो सुरुवातीला आम्ही मी आणि देवेंद्रजी आम्ही दोघेच होतो. पहिल्या कॅबिनेट बैठकीतही आम्ही राज्याच्या हिताचे निर्णय घेतले. शेतकऱ्यांसाठी, दुष्काळासाठी निर्णय घेतले. त्यानांतर मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन अजित दादा सोबत आले. शेवटच्या घटकापर्यंत न्याय मिळावा हीच सरकारची भूमिका असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.दरम्यान, राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावरून सध्या वातावरण तापलेले असताना या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भाषणाच्या वेळी एका व्यक्तीने जोरदार घोषणाबाजी केली. मात्र पोलिसांनी तात्काळ त्या व्यक्तीला कार्यक्रमस्थळावरून बाजूला नेले. हा गोंधळ झाला तेव्हा उपमुख्यमंत्री अजित पवार हे आरक्षणाच्या मुद्यावरच बोलत होते.

## रोहित पवार आज बीडमध्ये:श्रीक्षेत्र नवगण राजुरी येथील मंगलमूर्ती मंदिरात दर्शन घेऊन आजच्या युवा संघर्ष यात्रेची सुरुवात

**बीड–**राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आमदार रोहित पवार यांनी सुरू केलेल्या युवा संघर्ष यात्रेला बीड जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. रविवारी पाटोदा तालुक्यातून यात्रा बीड तालुक्यात आली. बीड ते पाटोदा या दरम्यान यात्रेत आ. संदीप क्षीरसागर, डॉ. नरेंद्र काळे, माजी आमदार पृथ्वीराज साठे, प्रदेश उपाध्यक्ष बबन गिते यांच्यासह इतर नेते चालले. राजुरीजवळील गजानन कारखाना परिसरात मुक्काम केल्यावर आज सोमवारी यात्रा शहरात येणार आहे. आजच्य यात्रेची सुरुवात सकाळी श्रीक्षेत्र नवगण राजुरी येथील मंगलमूर्ती मंदिरात दर्शन घेऊन झाली.युवक, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आ. रोहित पवार यांनी पुणे ते नागपूर अशी युवा संघर्ष यात्रा काढली आहे. मध्यंतरी मराठा आरक्षणामुळे नेत्यांना गावबंदी असल्याने ही यात्रा स्थगित केली होती. गावबंदी उठल्यानंतर पुन्हा यात्रा सुरू केली गेली आहे. शनिवारी पाटोद्यात मुक्काम



केल्यानंतर यात्रा पाटोदा-नायगावमार्गे राजुरीजवळील गजानन कारखाना परिसरात मुक्कामी होती. आज सोमवारी नवगण राजुरी येथून सुरुवात झाल्यानंतर यात्रा तिप्पटवाडी, मुर्शदपूर फाटा- आकाशवाणी- पॉलिटेक्निक कॉलेज- अंथरवण पिंपरी तांडा येथे मुक्कामी असणार आहे.श्रीक्षेत्र नवगण राजुरी येथील मंगलमूर्ती मंदिरात दर्शन घेऊन आज यात्रेची सुरवात केली. राजुरीचा गणपती इच्छापूर्ती गणपती म्हणून ओळखला जातो. या गणपतीसमोर प्रार्थना केली की, दुष्काळाच्या फेऱ्यात अडकलेल्या बळीराजाला लढण्याचे बळ मिळो, तसेच महाराष्ट्राचे सामाजिक स्वास्थ्य अभाधित राहो व महाराष्ट्राला आपले गतवैभव प्राप्त होवो अशीही इच्छा राजुरीच्या गणपतीसमोर मांडली, असल्याचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले. यावेळी बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर तसेच राजुरी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गावकऱ्यांनी आमदार रोहित पवार यांचे जल्लोषात स्वागत केले.नवगण राजुरी (बीड) येथील मंगलमूर्ती देवस्थान येथे संतोष शिंदे यांच्या संकल्पनेतून प्रणिता शिंदे आणि ज्ञानेश्वरी बहिर यांनी आमदार रोहित पवार यांचे छायाचित्र असलेली आणि युवा संघर्ष यात्रेचा लोगो असलेली रांगोळी काढली. त्यांची ही कलाकुसर पाहून मनापासून आनंद झाला आणि कौतुक वाटले, असल्याचेही आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

## सहकार चळवळ सर्वसामान्यांची,ती सशक्त झाली पाहिजे सहकार सप्ताह सोहळ्यात आ.प्रविण दरेकरांचे प्रतिपादन

**मुंबई–**मुंबई जिल्हा सहकारी बोर्ड, पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने घाटकोपर येथे आज भाजपा विधानपरिषद गटनेते आणि मुंबई जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांच्या हस्ते ’सहकार सप्ताह’ सोहळ्याचे उदघाटन पार पडले. यावेळी सहकार चळवळ ही सर्वसामान्यांची आहे. इथे कुणी टाटा, बिर्ला, अंबानी नाही. सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन उभ्या केलेल्या या संस्था आहेत. त्यामुळे सहकार चळवळ सशक्त झाली पाहिजे, असे प्रतिपादन दरेकर यांनी केले. याप्रसंगी सहकार आयुक्त अनिल कवडे, मुंबई जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, सहकारातील ज्येष्ठ नेते शिवाजीराव नलावडे, मुंबई बँकेचे संचालक प्रकाश दरेकर, अनिल गजरे, जयश्री पांचाळ, कविता देशमुख, आनंद गोळे, नितीन काळे, नितीन दहिभाते, सीताराम राणे, माजी संचालक डी. डी. पारले आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना दरेकर म्हणाले की, सहकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असा कार्यक्रम संपन्न होतोय. सहकारासमोर अनेक अडचणी आहेत. महाराष्ट्राला सहकाराचे वैभव प्राप्त झालेय. ग्रामीण भागाचा विकास सहकारावर झाला. महाराष्ट्राच्या विकासातही सहकाराचे फार मोठे योगदान आहे. मुंबईतील सहकारी संस्थांनी येथील सर्वसामान्य लोकांना ताकद,



आधार देण्याचे काम केले आहे. म्हणून या सगळ्या संस्था टिकल्या पाहिजेत, सशक्त झाल्या पाहिजेत यासाठी आपणच आपले संघटन मजबूत केले पाहिजे. याकरिता अशा प्रकारचे कार्यक्रम महत्वाचे असतात.दरेकर पुढे म्हणाले की, मुंबईत आपण सहकारातील एवढे कार्यकर्ते आहोत, सहकारी संस्था आहेत, १०० कोटीच्यावर उलाढाल करणाऱ्या अर्बन बँका आहेत, हौसिंग सोसायट्या आहेत. साधारण लाखोचे नेटवर्क या मुंबई शहरात असतानाही येथील आर्थिक व्यवस्थेवर आपले वर्चस्व नाही ही खंत माझ्यासारख्या सहकारातील कार्यकर्त्याला आहे. आपण अडचणीत आलो की राज्य शासनाकडे मदतीसाठी जातो. परंतु राज्यातील सहकारी संस्थांत एवढा पैसा आहे की सरकारच्या बजेटपेक्षा जास्त पैसे सहकारात आहेत.सहकारी संस्था, पतसंस्था, अर्बन बँकांचे अनेक वेगवेगळे प्रश्न आहेत. हौसिंग सोसायट्यांचे प्रश्न आहेत. ग्राहक सहकारी संस्थाच्या माध्यमातून मुंबईत एकेकाळी एक ग्राहक आणि शेतकऱ्याच्या माध्यमातून समन्वय साधून चळवळ होत होती. आज मुंबईत हातांच्या बोटावर मोजण्याइतपत ग्राहक सहकारी संस्था आहेत. याचे आपण आत्मपरीक्षण करणार आहोत की नाही? बेरोजगारांच्या सहकारी संस्था झाल्या त्या किती ऍक्टिव्ह मोडमध्ये आहेत? या सर्व गोष्टींचे मूल्यमापन होऊन त्यांच्या अडचणी शोधून त्यावर उपाययोजना करत हे क्षेत्र मजबूत करण्याची जबाबदारी मुंबईसारख्या सहकारी बोर्डाने नेतृत्व करण्याची गरज आहे आणि त्यात्या संस्थांची फेडरेशन आहेत त्यांच्या मदतीने येणाऱ्या काळात आराखडा तयार करून आपल्याला भविष्यात काम करण्याची गरज असल्याचेही दरेकर म्हणाले.तसेच मी बोलघेवडेपणा, भाषणबाजी करत नाही. विधिमंडळाच्या सभागृहात राज्याच्या सहकार चळवळीवर बाहेर ताशेरे ओढले गेले त्यावेळी सरकार कुठलेही असो तुटून पडण्याचे काम सहकारातील कार्यकर्ता म्हणून मी केले आहे. सहकार बदनाम करण्याचे काम जर कुणी करत असेल तर ते राज्यातील सहकारी कार्यकर्ता सहन करणार नाही अशा प्रकारची भुमिका घेऊन येणाऱ्या काळात आपल्याला काम करण्याची गरज असल्याचे दरेकर म्हणाले. यावेळी दरेकर यांनी अर्बन बँका, पतसंस्थांच्या विषयीही उपस्थितांना माहिती दिली. त्याचबरोबर अर्बन बँका, पतसंस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण गती घेत असल्याचेही सांगितले.दरेकर पुढे म्हणाले की, जिल्हा बँकेचे नेतृत्व करत असताना सहकारी संस्थांना ताकद कशी देता येईल, सहकार चळवळ कशी बळकट करता येईल याचाच सातत्याने आमचा प्रयत्न असतो. हौसिंगसाठी सेल्फ डेव्हलपमेंट योजना आणली. बिल्डरशिवाय गृहनिर्माण संस्थांनी स्वतःची इमारत पुनर्विकास करावी यासाठी सेल्फ डेव्हलपमेंट संकल्पना आणली. आज आमच्याकडे सोळाशे प्रस्ताव आलेत. ३०-३२ प्रस्तावांना कर्ज मंजूर केले आहे. त्यातील सात ते आठ इमारती प्रत्यक्षात उभ्या राहिल्या आहेत. जिल्हा बँक जर ताकदीने पाठीशी उभी असेल तर हे अभियान पुढे गेले पाहिजे. सहकाराचा उपयोग अशा पद्धतीने करणार नसू आणि रुटीन सहकार घेऊन जाणार असू तर या बदलत्या युगातील स्पर्धेत टिकणार नाही. त्या दृष्टीने येणाऱ्या काळात काम करावे लागणार आहे.

# कापसाला मिळत नाही भाव
# त्यात कापूस चोरटे सुसाट

## चोरट्यांनी तीन क्विंटल कापूस केला लंपास;शेतकरी चिंताग्रस्त



**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**
नेहमीप्रमाणे कापूस तोडणीनंतर कापूस एका शेतकऱ्याने अंगणात साठवून ठेवले.मात्र रात्रीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी डाव साधत चक्क का लंपास केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

सध्या कापूस तोडणीचा हंगाम सुरू असून सोबतच धान कापणीला देखील वेग आलेला आहे.शेतकरी कापूस तोडणीनंतर सकाळी त्याचे वजन करून मजुरांना पैसे देतात व त्यांचे कापूस साठवायचे कापडे देतात आणि मजूर तेच कापडे घेऊन कापूस तोडणीला थेट शेतात जात असतात ही पद्धत तालुक्यात सर्वत्र पाहायला मिळते.अशातच गोंडपिपरी तालुक्यातील वढोली येथील शेतकरी नरेंद्र कोहपरे यांनी दि.(१९)रविवारी कापूस तोडणीनंतर कापसाचे गाठोडे नेहमीप्रमाणे अंगणात ठेवले व कुटुंबीय झोपी गेले.सकाळी कापसाचे वजन करण्यासाठी बघतात तर गाठोडेच चोरट्यांनी लंपास केल्याचे निदर्शनास आल्याने एकच खळबळ उडाली.दुबार तिबार पेरणीमुळे शेतकरी चिंताग्रस्त असून अध्यापही शेतकऱ्यांना पिक विमा,अतिवृष्टीचे पैसे अजूनही सरकारकडून मिळाले नाही,पिकांना योग्य भाव नाही आर्थिक विवंचनेत असताना अशी घटना घडल्याने शेतकरी चिंताग्रस्त दिसत आहे.गावातील बहुतांश शेतकरी आपल्या अंगणामध्ये कापूस ठेवतात पण या चोरीमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बाहेर ठेवलेल्या कापसाची सर्वच शेतकरी सावधानता बाळगत सुरक्षित ठिकाणी विल्हेवाट लावतानाचे चित्र दिसत आहे.

# अजय कंकडालवार यांनी सोयाम कुटुंबियांना केली आर्थिक मदत



**अहेरी । प्रतिनिधी**
तालुक्यातील नांदीगाव येथील प्रतिष्ठित नागरिक दीपक गंगाराम सोयाम यांना काही दिवसा पूर्वी अल्सर पोटातील आजार असल्याने दीपक सोयाम यांना नागपूर येथील दवाखान्यात उपचारासाठी भर्ती करण्यात आले होते.ईश्वरा कृपेने त्यांची प्रकृती ठीक झाली असून.सोयाम कुटूंबियांची घरची परिस्थिती हलाकीची असल्याने त्यांना स्वगवी नंदिगांव येण्यासाठी अडचण भासत होती.

हीअडचण आविसं अजय मित्र परिवाराचे पदाधिकारी कडून आविसं अजय मित्र परिवारचे विदर्भ नेते व लोकप्रिय माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांना माहिती देताच.सोयाम कुटुंबातील नातेवाईकांना अहेरी अजय कंकडालवार यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे बोलावून सोयाम कुटुंबातील अडचण जाणून घेऊन.त्यांना स्वगवी येण्यासाठी आर्थिक मदत करण्यात आली.अजून कोणत्याही मदतीसाठी माझ्याशी सरळ संपर्क करा म्हणून सोयाम कुटुंबातील नातेवाईकांना सांगण्यात आले.यावेळी सोयाम कुटुंबातील नातेवाईकांनी अजय कंकडालवार यांचे आभार मानले.यावेळी आविसं अजय परिवाराचे पदाधिकारी देवलमारी ग्रामपंचायतचे उपसरपंच हरीश गावडे,संदीप दुर्गे,श्रीनिवास राऊत,जगन्नाथ मडावी,माजी उपसरपंच मोसम दिलीप मडावी,रुपेश कनाके,सुधाकर आलाम,अहेरी नगरपंचायतचे नगरसेवक प्रशांत गोडसेलवार,राकेश सडमेकसह आविसं अजयभाऊ मित्र परिवारचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच सोयाम कुटूंबातील सदस्य उपस्थित होते.

# पत्रकारांनी भरगच्च 'गदिमा' ठरले अधिवेशन ठरावाच्या मंजुरीचे साक्षिदार

## व्हाईस ऑफ मीडिया राज्य शिखर अधिवेशन १४ ठराव मंजूर, शासनाकडे करणार पाठपुरावा

**बारामती । प्रतिनिधी**
दोन दिवसापासून बारामती येथे सुरू असलेल्या व्हाईस ऑफ मीडियाच्या राज्य शिखर अधिवेशना चा समारोप झाला. पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळाची निर्मिती करून भरीव निधी उपलब्ध करून देण्यात यासह १४ ठराव यावेळी मांडण्यात आले. हात उंचावून पत्रकारांनी भरगच्च असलेले गदिमा सभागृह या ठरावाच्या मंजुरीचे साक्षिदार ठरले!या प्रसंगी मंचावर राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे सरचिटणीस चंद्रमोहन पुप्पाला, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, राज्य उपाध्यक्ष अजितदादा कुंकूलोळ यांच्यासह प्रदेश टीम, विभागीय अध्यक्ष, आणि सर्व जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.

व्हाईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी संजय पडोळे यांनी ठराव वाचन या प्रसंगी केले. यात



१. पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळाची निर्मिती करून भरीव निधी उपलब्ध करून देण्यात यावा.
२. रेडिओ टीव्ही सोशल मिडिया कर्मचाऱ्यांना श्रमिक पत्रकार मान्यता द्यावी.
३. पत्रकार हल्ला विरोधी कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यात यावी.
४. पत्रकार पाल्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी कोटा ठरवून द्या.
५. केंद्र डिजिटल मिडीयाच्या नोंदणी कायद्यात बदल करावे.
७. नियतकालिक नियमात बदल करावे.
८. १० वर्षे पत्रकारितेत काम करणाऱ्यांना वैद्यकीय उपचार मोफत मिळावे.
९. पत्रकारांचे वेतन मानधन याबाबत धोरण निश्चित करावे.
१०. प्रत्येक जिल्ह्यात पत्रकार भवन व वसाहत निर्माण करावी.
११. दहा वर्षे पूर्ण झालेल्या पत्रकारांना सरसकट अधिस्वीकृती देण्यात यावी.
१२. दैनिक व साप्ताहिकांना देण्यात येणारा जाहिरातींचे धोरण ठरवावे.
१३. शासन स्तरावर पत्रकार सन्मान योजना राबवावी.
१४. संदीप महाजन यांच्यावर झालेल्या हल्ल्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, यांचा समावेश होता.

पत्रकारांच्या न्याय हककाच्या असलेल्या मागणीरुपी ठरावांना सर्वांनी हात उंचावून मंजुरी दिली.

# आमदार जोरगेवार यांनी छठपुजेत घेतला सहभाग

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
उत्तर भारतीयांचा पवित्र सन असलेल्या छठ पुजेचे चंद्रपूरातील विविध घाटांवर आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर घाटांवर उपस्थिती दर्शवत छठपूजेत सहभाग नोंदवला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी उत्तर भारतीयांना पवित्र छठ पूजा पर्वाच्या शुभेच्छा दिल्यात. तसेच या प्रसंगी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने या ठिकाणी मिठाई वाटप करण्यात आले.या प्रसंगी यंग चांदा ब्रिगेडचे शहर संघटक विश्वजीत शाहा,यंग चांदा ब्रिगेडच्या विधी विभागाचे जिल्हा अध्यक्ष . परमहंस यादव,चंद्रमा यादव,ताहिर हुसेन,क्रिष्णा यादव,सुदामा यादव, हरिनाथ यादव,दशरथ मिठ्ठावार,गोरंग पाल,राजेश शिवधारी यादव,सुनिल सोनार,बिरेश शाहा,अक्षय मिस्त्री,जितु गुप्ता आदींची उपस्थिती होती.



चंद्रपूर हा औद्योगीक जिल्हा असल्याने परप्रांतातील विविध धर्मीय नागरिक येथे स्थायी झाले आहे. यात उत्तर भारतीय समाजाचीही संख्या मोठी आहे. दरवर्षी येथे उत्तर भारतीयांचा पवित्र उत्सव असलेल्या छठ पुजेचे मोठ्या उत्साहात आयोजन केल्या जात असते. यंदा ही उत्तर भारतीय समाजाच्या वतीने चंद्रपूरातील विविध घाटांवर छठ पुजेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी लालपेठ शिव मंदिर घाट,पागल बाबा नगर घाट,लालपेठ घाट या सह विविध घाटांवर उपस्थिती दर्शवत छठ पुजेत सहभाग घेतला. यावेळी सुर्याला अर्घ अर्पण करुन आमदार किशोर जोरगेवार यांनी पुर्जा अर्चना केली. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार यांनी मिठाई वाटप करुन उत्तर भारतीयांना छठपुजा पर्वाच्या शुभेच्छा दिल्यात.

# राजुऱ्यात 'गुड मॉर्निंग' लाच दारूविक्री राज्य उत्पादन शुल्क विभाग झोपेत

**राजुरा**–येथील काही परवानाधारक दारू दुकानदार हे निर्धारित वेळेला 'वाकोल्या' दाखवून 'गुड मॉर्निंग' ला दारूविक्री करीत असल्याची माहिती समोर येत आहे.त्यामुळे राम प्रहरी दारू ढोसणाऱ्या तळीरामाना 'अच्छे दिन' आले आहे.हा गंभीर प्रकार खुलेआमपणे सुरू असतांना राज्य उत्पादन शुल्क विभाग मात्र झोपेत आहे.त्यामुळे अधिकाऱ्यांचा दुर्लक्षितपणा दारू विक्रेत्यांच्या पथ्यावर पडत असल्याने त्यांना मोकळे रान मिळत आहे.

शहरातील बिअरबार,देशी दारु,वाईन व बियर शॉपी या दारूविक्री करणाऱ्या परवानाधारकांना दुकानांचे शटर उघडण्याच्या निर्धारित वेळा दिल्या आहे व सोबतच बंद करण्यासाठी वेळेचे बंधन ठरले आहे.सध्या शहरात नाका नंबर ३,गडचांदूर,बल्लारपूर,चुनाळा रोड व तेलंगणा राज्याकडे जाणाऱ्या मार्गावर परवाना धारकांचे दारू दुकान आहे.बियरबार,देशी दुकान,वाईन व बियर शॉपी यांना दुकानांचे शटर उघडण्यासोबतच बंद करण्याच्या निर्धारित वेळा दिल्या आहे.पण यातील काही दुकानदार वेळेचे बंधन न पाळता सकाळीच दारूविक्री करीत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. सकाळी ६ ते ७ वाजताच दुकानाच्या 'बक डोअर' ने सर्रासपणे दारूविक्री केली जात आहे. काही परवानाधारक सोई नुसार दारू विक्री करीत असल्याने 'गुड मॉर्निंग' ला दारू ढोसणाऱ्या तळीरामाची शाळा भरत आहे.

# गडचांदूर येथे फिरते रुग्णसेवा केंद्राचे लोकार्पण




**चंद्रपूर । प्रतिनिधी**
औद्योगिक नगरी गडचांदूर येथे हिंदुस्थान कॉर्पोरेशन तथा वोक्हार्ट फाऊन्डेशन यांचे संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील रुग्णांच्या हितासाठी झटणारे, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांचे विशेष प्रयत्न व सहकार्यातून राजूरा विधानसभा क्षेत्रातील चारही तालुक्याकरीता उपलब्ध झालेल्या फिरते रुग्णालय सेवा केंद्राचे लोकार्पण दि. १९ नोव्हेंबर रोजी गडचांदूर येथे आयोजित कार्यक्रमात पार पडले.

राजुरा विधानसभा हे दुर्गम क्षेत्र असल्याने या ठिकाणी ग्रामिण क्षेत्रात स्वास्थ्य सुविधांचा अभाव तसेच ग्रामिण कष्टकरी, शेतकरी व अन्य आजारी रुग्णांना कामधंदे सोडून शहराकडे उपचाराकरीता यावे लागते. त्यांना या फिरते रूग्णालय सेवा केंद्रामुळे मोठी सोय होणार असून नागरीकांनी या रुग्णालयाशी नाळ जोडून वैद्यकीय उपचार घ्यावा असे आवाहन हंसराज अहीर यांनी आपल्या उद्घाटकीय संबोधनातून केले.यावेळी हिंदुस्थान कार्पोरेशन लिमी. चे उपमहाप्रबंधक मुकुंद जवंजाळ यांनी याप्रसंगी सांगीतले की, सामाजिक दायीत्वाच्या भावनेतून ही सेवा या तालुक्यातील जनतेला देतांना मनस्वी आनंद वाटतो. या आरोग्य सेवेचा लाभ तालुक्यात सर्वदूर पोहचावा अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून वोक्हार्ट फाऊन्डेशन मुंबईचे जितेश लांबीया माजी आमदार ॲड. संजय धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, भाजपाचे लोकसभा विस्तारक खुशाल बोंडे, माजी जि.प. अध्यक्ष देवराव भोंगळे, जिल्हा शल्य चिकित्सक महादेव चिंचोळे, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. कटाने, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्निल टेंभे, डॉ. गायकवाड यांचेसह गडचांदूर, राजुरा, जिवती तालुक्यातील बंधूभगिनींची बहूसंख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन निलेश ताजने यांनी केले. उपस्थितांचे आभार सतिश उपलेंचिवार यांनी मानले.

# खा.अशोक नेते यांच्या हस्ते देवरी येथे धान्य खरेदी केंद्राचा शुभारंभ

**देवरी । प्रतिनिधी**
आदिवासी विविध कार्यकारी सह.संस्था ता. देवरी. येथे धान्य खरेदी केंद्राचा शुभारंभ खासदार अशोक नेते यांच्या शुभहस्ते पार पडला.या धान्य खरेदी केंद्राचा शुभारंभा प्रसंगी खासदार अशोक नेते यांनी आपले मत व्यक्त करतांना शेतकऱ्यांनी पिकवलेल्या धान्याला आधारभूत किंमत मिळावी यासाठी सरकारने आधारभूत धान्य खरेदी केंद्रे सुरु केले आहे. या अनुषंगाने आज आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था ता.देवरी चा धान्य खरेदी केंद्राचा शुभारंभ झाला. यांचा लाभ देवरी परिसरातील शेतकऱ्यांनी घ्यावा असे आवाहन खासदार अशोक नेते यांनी उदघाटन समारंभ सोहळा प्रसंगी केले.यावेळी प्रामुख्याने माजी आमदार संजय पुराम, आदिवासी वि.महामंडळाचे संचालक भरतसिंग दुधनाग,संचालक को-ऑ. बँक गोंदियाचे महेशकुमार जैन, आदिवासी



संस्था चे अध्यक्ष धुलीचंद मानकर, सभापती कृ.उ.बा. स.देवरी चे प्रमोद संगीडवार,देवरी चे नगराध्यक्ष संजय उईके, भाजपा जिल्हा महामंत्री अनिल येरणे, नगरसेविका कौशल्या कुमरे,संचालक रुपलाल पंधरे, संचालक प्रभा राऊत,संचालक ईसाराम मानकर,संचालक दिलिप राऊत, भाषकर मानकर,सुशिल शेंद्रै,सामाजिक नेते बंटी भाटीया, तसेच मोठ्या संख्येने नागरिक व शेतकरी बांधव उपस्थित होते.

# गोवा येथील क्रीडा स्पर्धेत आस्थाला रजतपदक



**आष्टी (श.) । प्रतिनिधी**
गोवा येथे ३७ वे नॅशनल गेम्स आयोजित करण्यात आले होते. त्यात आष्टी येथील रहिवासी आस्था रवींद्र गायकी यांना लोबा सिकाई फाईट या क्रीडा प्रकारात रौप्यपथक प्राप्त झाले आहे. इंडियन ऑलंम्पिक असोसिएशन, मिनिस्ट्री ऑफ युथ वेल्फेअर ॲण्ड स्पोर्ट गव्हरमेंट ऑफ इंडिया यांच्या वतीने २६ सप्टेंबर ते ९ नोव्हेंबर या कालावधीत गोवा येथे ४३ क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

देशातील २१ राज्यातील ११०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील लहानआर्वी येथील रहिवासी असलेली आस्था रवींद्र गायकी हिने लोबा सिकाई फाईट या क्रीडा प्रकारात ४६ किलो वजनगटात जम्मू-काश्मीरच्या खेळाडूंशी झुंज देत एका गुणाने मागे राहून रौप्यपदक प्राप्त केले. तिने मिळविलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. नॅशनल गेम्समध्ये महाराष्ट्रातील १८ खेळाडूंनी भाग घेतला होता. यामध्ये दोन सुवर्ण, दोन रौप्य व चार कांस्यपदक खेळाडूंनी प्राप्त केले आहे. खेळाडूंनी आपल्या यशाचे श्रेय प्रशिक्षक व वडील रवींद्र गायकी यांना दिले. रवींद्र गायकी हे सिकाई मार्शल आर्ट या खेळाचे आंतरराष्ट्रीय खेळाडू असून उत्तम प्रशिक्षक आहे. आस्थाच्या यशाबद्दल प्रीतम गायकी, हनुमान गायकी, आनंद गायकी यांच्यासह गायकी परिवार व इतरांनी तिचे भरभरून कौतुक केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .